वाचले :- १) मा.आयुक्त सो.यांच्याकडील दि.०६/०६/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्रमांक माध्य/शि/०१/कावि/ 362 /२०२३
दिनांक - 30 /०६/२०२३

विषय:-सहाय्यक शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियतकालिक व वैद्यकिय ऑनलाईन बदल्यांबाबत

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सहाय्यक शिक्षकांच्या बदल्यासंदर्भात परिपत्रक जा.क्र.माध्य/शि/०१/कावि/१३०/२०२३ दिनांक ०२/०३/२०२३ व जा.क्र.माध्य/शि/०१/कावि /२७७/ २०२३ दिनांक ०३/०६/२०२३ अन्वये ऑनलाईन बदली धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार माध्यमिक शिक्षण विभाग आस्थापनेवरील बदली पात्र शिक्षकांना दि.२३/०६/२०२३ रोजी समक्ष उपस्थित राहून समुपदेशाने बदली विद्यालये देणेत आलेले आहेत.त्यानुसार खालील सहाय्यक शिक्षक यांना त्यांच्या नावापुढे स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या विद्यालयामध्ये नियतकालिक व वैद्यकिय बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संगणक क्रमांक | सहाय्यक शिक्षक कर्मचारी नाव | सध्याचे विद्यालय | बदली नंतरचे पदस्थापना विद्यालय |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | ८८८२ | गोरे राजेंद्रकुमार सोपान | मा.वि.भोसरी | मा.वि.लांडेवाडी |
| २ | ८८९७ | ताठे शुभदा राजेंद्र | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.थेरगाव |
| ३ | ८८९४ | टकले कृष्णराव सोमनाथ | मा.वि.थेरगाव | मा.वि.पिंपळे गुरव |
| ४ | ८८९२ | शेख सहेलिना सादिक | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.पिंपळे गुरव |
| ५ | ९१०९ | गाथा रूपाली चेतन | मा.वि.संत तुकारामनगर | मा.वि.थेरगाव |
| ६ | १०२०३ | देसाई मनिषा विठ्ठल | मा.वि.थेरगाव | मा.वि.पिंपळे सौदागर |
| ७ | १०२०९ | चेमटे संतोष धोंडिभाऊ | मा.वि.पिंपळे गुरव | मा.वि.संत तुकारामनगर |
| ८ | १०२०५ | गुजर शामला नितीन | मा.वि. नेहरूनगर | मा.वि.पिंपळे सौदागर |
| ९ | १०२१३ | मिसाळ विद्या सुरेश | मा.वि.पिंपळे गुरव | मा.वि. नेहरूनगर |
| १० | १०७५८ | शिंदे नवनाथ किसन | मा.वि.लांडेवाडी | मा.वि.कासारवाडी |
| ११ | १०८४० | राठोड प्रमोद किसनराव | मा.वि.कासारवाडी | मा.वि.भोसरी |
| १२ | ८८८६ | तळपे मनोज श्रावण | मा.वि.रूपीनगर | मा.वि.पिंपळे गुरव |
| १३ | ८८८१ | राऊत सविता रविंद्रनाथ | मा.वि.भोसरी | मा.वि. लांडेवाडी |
| १४ | ९०८६ | भालेराव संतोष बबन | मा.वि.फुगेवाडी | मा.वि.पिंपळे सौदागर |
| १५ | १०७२१ | सावंत विद्यानंद लक्ष्मण | मा.वि. लांडेवाडी | मा.वि.थेरगाव |
| १६ | १०७०९ | साळवे भास्कर कचर | मा.वि.पिंपळे गुरव | मा.वि.थेरगाव |
| १७ | १०७१९ | भोये मोहन वामन | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.थेरगाव |
| १८ | १०८३७ | गुळवे राधाकिसन बाबाजी | मा.वि.थेरगाव | मा.वि.रूपीनगर |
| १९ | १०९६५ | परदेशी बापू लक्ष्मण | मा.वि.थेरगाव | मा.वि.फुगेवाडी |
| २० | १०३१२ | शेळके रोहिणी दत्तात्रय | मा.वि.थेरगाव | मा.वि.भोसरी |
| २१ | ८९०६ | ताम्हाणे सुनिता ज्ञानेश्वर | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.थेरगाव |
| २२ | ८९०५ | चौगुले अंजली सचिन | मा.वि.थेरगाव | मा.वि.पिंपळे गुरव |
| २३ | १०३८२ | बिराजदार शिवराज बब्रु | मा.वि. रूपीनगर | मा.वि.भोसरी |
| २४ | १०२५६ | खाडे रोहिणी भिमराव | मा.वि.निगडी | मा.वि.रूपीनगर |
| २५ | १०७२४ | गोसावी अंकुश महादेव | मा.वि.थेरगाव | मा.वि.पिंपळे सौदागर |
| २६ | १०७०८ | तायडे सुनिल विष्णू | मा.वि.पिंपळे गुरव | मा.वि.थेरगाव |
| २७ | १०७५५ | कराळे विद्या सुधीर | मा.वि.भोसरी | मा.वि.निगडी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | ९३१४ | बनसोडे उदयकुमार संभाजी | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.थेरगाव |
| २९ | ६३६७ | शेळकंदे यमा दगडू | मा.वि.नेहरूनगर | मा.वि.पिंपळे सौदागर |
| ३० | १०२०४ | शिंदे क्षितीज सत्यविजय | मा.वि.थेरगाव | मा.वि.पिंपळे सौदागर |
| ३१ | १०२१६ | हडपसरकर वर्षा इंद्रजित | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.नेहरूनगर |
| ३२ | ८९३२ | कोकणे नामदेव बारकू | मा.वि.पिंपळे गुरव | मा.वि.क्रिडा प्रबोधिनी |
| ३३ | १०६२७ | पाटील सोनाली बाबासाहेब | मा.वि.थेरगाव | मा.वि.पिंपळे गुरव |
| ३४ | ८८३० | वचकल ऋषीकांत निवृत्ती | मा.वि.क्रिडा प्रबोधिनी | मा.वि.थेरगाव |
| ३५ | ९३२३ | जाधवर निता मोतीराम | मा.वि.खराळवाडी | मा.वि.रूपीनगर |
| ३६ | १०५२८ | झगडे योगेश यशवंत | मा.वि.रूपीनगर | मा.वि.खराळवाडी |
| ३७ | ९२४९ | शिंगाडे विलास तुकाराम | मा.वि.भोसरी | मा.वि.पिंपळे सौदागर |
| ३८ | ९५५५ | पवार अरूण हिरालाल | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.भोसरी |
| ३९ | ९३११ | आल्हाट प्रमिला विजय | मा.वि.पिंपळे सौदागर | मा.वि.क्रिडा प्रबोधिनी |

उपरोक्त अ.क्र.०१ ते ३९ शिक्षकांना बदलीच्या ठिकाणी रुजू होणेकामी या आदेशान्वये तात्काळ (stand realeased) कार्यमुक्त करण्यात येत असून त्यांनी बदली दिलेल्या विद्यालयात दिनांक ०३/०७/२०२३ पर्यंत रुजू होऊन रुजू अहवालाची एक प्रत माध्यमिक शिक्षण विभागाकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी. उपरोक्त शिक्षकांनी १५/०७/२०२३ पर्यंत तात्काळ लेखी स्वरूपात कार्यभार हस्तांतरण करावे व तसा अहवाल संबंधित मुख्याध्यापकांना द्यावा अन्यथा सदर शिक्षक हे प्रशासकीय कारवाईस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरीत्या होण्याकरिता संबंधित मुख्याध्यापकांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे .

१) माध्यमिक शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेल्या बदल्या ह्या वार्षिक नियतकालीक, वैद्यकिय व सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने बदलीने पदस्थापना देण्यात आलेली आहे.

२) बदलीबाबतचे आदेश सर्व संबंधित विद्यालयाला पाठविण्यात येत असून विद्यालयांनी पर्यायी शिक्षक हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या शिक्षकांना तात्काळ आदेश बजावण्यात यावेत. सदरचे आदेश हेच कार्यमुक्तीचे (stand realeased) आदेश असून संबंधित मुख्याध्यापकांनी स्वतंत्र आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.

३) उपरोक्त शिक्षकांनी आपलेकडील कामकाजाचा कोणाकडे कार्यभार हस्तांतरित करावा याबाबत संबंधित विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी त्यांना लेखी स्वरूपात सूचना द्याव्यात. तथापि,सदर शिक्षकांनी विहित कालावधीमध्ये कार्यभार हस्तांतरण न केल्यास त्यांचेवर बदलीपूर्व विद्यालयाचे मुख्याध्यापकांनी नियमाधीन कारवाई प्रस्तावित करावी.

४) बदली झालेले शिक्षक त्यांच्या संबंधित विद्यालयातून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करून घ्यावे.एखाद्या कर्मचाऱ्याला रुजू करून न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतीक्षा काळ ठरवून वर्ग न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास त्यास संबंधित विद्यालयाच्या मुख्याध्यापकांना सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल.

५) बदली करण्यात आलेल्या शिक्षकांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू / हजर न झाल्यास बदली आदेशाचा अवमान केल्यास, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या गोपनीय अहवालात याबाबतची नोंद घेण्यात येईल. तसेच राजकीय दबावाबाबतची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९ मधील नियम ३(३)ब २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची स्पष्ट नोंद घेण्यात यावी.

६) महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ मधील नियम ३०(सी) नुसार मूळ विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी बदली झालेल्या शिक्षकांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारू नयेत, असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणीकृत डाकेने परत करावेत. तसेच आदेशात नमूद केलेनुसार संबंधित शिक्षक विहित मुदतीत दिलेल्या दिनांकापूर्वी संबंधित शिक्षक शाळेत रुजू न झाल्यास किंवा गैरहजर असल्यास तेथून पुढे रुजू होईपर्यंत त्यांच्या विनावेतनी करण्यात याव्यात.

७) उपरोक्त बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व शिक्षकांचे माहे जुलै २०२३ पासून चे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदली पूर्वीच्या विभागाकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित शिक्षकाच्या बदलीच्या विभागात हजर झाल्यानंतर बदली नंतरच्या विभागाने काढावे. व तसा अहवाल माध्यमिक शिक्षण विभागाकडे सादर करावा.

८) तसेच उपरोक्त कालावधीतील वेतन बदली पूर्वी कार्यरत असलेल्या विद्यालयातील आहरण व वितरण मुख्याध्यापकाने अदा केल्यास त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येऊ त्यांचेवर नियमाधीन कारवाई करण्यात येईल अशा सूचना सर्व मुख्याध्यापकांना देण्यात येत असून लेखा विभागाने वेतन बिलांची अदायगी करताना तशी दक्षता घ्यावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे-१८.

प्रती : सर्व संबंधित शिक्षक / मुख्याध्यापक,मा.वि.______________

प्रती:

१) लेखा विभाग
२) लेखा परिक्षण विभाग
३) प्रशासन विभाग

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८